# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

### जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती
### (Committee for Prevention of Caste Based Discrimination)

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दि.२४/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्यासंदर्भात जातीआधारित भेदभाव होत असल्यास अशा तक्रारींचे निवारण करण्यासाठी जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे (**Committee for Prevention of Based Discrimination in Shivaji University Kolhapur**) गठन करण्यात यावे, असे कळविले आहे.

यासंदर्भात खालीलप्रमाणे जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे गठन करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. नितीन कांबळे, प्राध्यापक,प्राणीशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | अध्यक्ष |
| २. | श्री. अमरसिंह रजपूत, व्य.प.सदस्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ३. | प्रा.डॉ. एस.टी. कोबंडे, प्राध्यापक, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सदस्य |
| ४. | प्राचार्य डॉ. संजय डी.पाटील, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता.कागल, जि.कोल्हापूर. | सदस्य |
| ५. | डॉ. किशोर कुच्चे, सहयोगी प्राध्यापक, गणित अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सदस्य |
| ६. | श्रीमती उर्मिला क्षिरसागर, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या, महाविद्यालय,खानबाग, सांगली. | सदस्य |
| ७. | श्री. आनंदराव खामकर, अति.महासचिव तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सदस्य |
| ८. | श्री. दिपक शिंदे. पदवी वितरण विभाग. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सदस्य |
| ९. | श्रीमती विभा अंत्रेडी, उपकुलसचिव, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सदस्य—सचिव |

अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्यासंदर्भात जातीआधारित भेदभाव होत असेल तर तक्रारदाराने त्याबाबतची तक्रार प्रथम संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक/अथवा अधिविभागप्रमुख, पदव्युत्तर अधिविभागप्रमुख यांचेकडे करावी. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख यांचे स्तरावर तक्रारीचे निवारण न झाल्यास तक्रारदाराने लेखी तक्रार अध्यक्ष, जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती, विशेष कक्ष विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे पाठवावी. ऑनलाईन स्वरुपात तक्रार नोंदविण्याकरिता विदयापीठाच्या वेबसाईटवर लिंक उपलब्ध करण्यात आली आहे.

आदेशावरुन,

कुलसचिव

जा.क्र.शिवाजी विद्यापीठ/विशेष कक्ष/883/2025-26
दिनांकः— 6 FEB 2025

प्रति—

१. सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,पदव्युत्तर अधिविभाग.
२. सर्व प्राचार्य/संचालक, संलग्न महाविद्यालये व मान्यतापात्र संस्था.
३. सर्व प्रशासकीय अधिकारी/विभागप्रमुख.
४. इंटरनेट विभाग.